# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## छत्तीसगड राज्यातील विद्यार्थ्यांनी मेट्रो भवनला भेट दिली

## बहुस्तरीय वाहतूक प्रणाली आणि इतर बांधकाम पाहून झाले प्रभावित



नागपूर : महामेट्रोने बांधलेल्या नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांना जागतिक दर्जाच्या सुविधांसह वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, तर दुसरीकडे नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प हा मार्गदर्शक घटक राहिला आहे. महामेट्रोने केलेले अकल्पनीय काम लोकांच्या आकर्षणाचे केंद्र राहिले आहे. नागपूर मेट्रोच्या कामाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नामांकन आहे. महामेट्रोने बांधकामासाठी अवलंबलेल्या पद्धतीचे निरीक्षण करण्यासाठी शहर व इतर जिल्ह्यांतून तंत्रशिक्षणाच्या विद्यार्थ्यांची विशेष पथके येतात. नुकतेच चंद्रपूरच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच रामटेक मधूनही विद्यार्थ्यांचे पथक बांधकाम पाहायला पोहोचले होते. नागपूर मेट्रोची चर्चा इतर राज्यातही गाजत आहे. बुधवारी छत्तीसगढ राज्यातील बिलासपूर शहरातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सिव्हिल इंजिनीयरची टीम शहरातील मेट्रोशी संबंधित बांधकाम आणि ट्रेन ऑपरेशनशी संबंधित कामकाज आणि उपक्रम जाणून घेण्यासाठी मेट्रो भवनात पोहोचली होती.



मेट्रोच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी मेट्रो भवनात सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. शहरात मेट्रो प्रकल्प कसा उभारला गेला, याची माहिती व्हिडिओद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आली. मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी बांधकामात अवलंबलेल्या अद्ययावत पद्धतीची माहिती दिली. शहरातील सर्वात वर्दळीच्या व अरुंद चौकातील इंटरचेंज स्टेशनच्या बांधकामाची माहिती मिळताच तंत्रशिक्षणाशी निगडित विद्यार्थ्यांनी आश्चर्य व्यक्त केले व सुंदर व अनोख्या बांधकामाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. विद्यार्थ्यांची एचओडी भूमिका दास आणि प्राध्यापक आशिष सुख ह्यांनी सांगितले की, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या बांधकामाबाबतची चर्चा ऐकल्यानंतर विद्यार्थ्यांना हा प्रकल्प प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा झाली.आज विद्यार्थ्यांची इच्छा पूर्ण झाली.



- सुंदर डिझाइन केलेले स्टेशन

लक्ष्मीचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बिलासपूरचे विद्यार्थी सकाळी रेल्वेने नागपूरला पोहोचले. स्टेशनजवळ बांधलेले मेट्रो स्टेशन पाहून सिव्हिल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टेशनचे डिझाईन चांगलेच भावले. भूमिका म्हणाली की, मेट्रो स्थानकांची रचना अतिशय सुंदर आहे. मेट्रोमध्ये प्रवास केल्यानंतर विद्यार्थी मेट्रो भवनात पोहोचले. मेट्रो भवनातील नागपूर मेट्रो प्रकल्पाचे मॉडेल, लायब्ररी, सभागृह पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांनी नियंत्रण कक्ष गाठला. यावेळी मेट्रो ट्रेनच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. महामेट्रोकडून वर्धा मार्गावर बांधण्यात आलेल्या डबल डेकरची तांत्रिक माहिती देण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग आणि व्हायाडक्टवरील मेट्रो रेल्वेच्या बांधकामाची वैशिष्ट्ये अतिशय बारकाईने समजून घेतली. कामठी मार्गावर बहुस्तरीय वाहतूक व्यवस्था उभारण्यासंदर्भातील व्हिडिओ पाहून विद्यार्थी आश्चर्यचकित झाले. असे बांधकाम आपण प्रथमच पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी व्हायाडक्टच्या बांधकामाबाबत तांत्रिक ज्ञान मिळवले. नागपूर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामाबाबतही तपशील देण्यात आला. महामेट्रोतर्फे नागपूर, पुणे, नवी मुंबई येथे सुरू असलेल्या कामांची माहिती मुलांना देण्यात आली. नाशिकमधील निओ मेट्रो प्रकल्पाचीही माहिती देण्यात आली. मेट्रो भवनला भेट देताना मिळालेल्या तांत्रिक बाबी पाहून विद्यार्थी भारावून गेले. आजचा दिवस आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे, आम्हाला मिळालेली माहिती नक्कीच आम्हाला मार्गदर्शन करेल आणि उज्ज्वल भविष्याचा मार्ग मोकळा करेल, असे ते म्हणतात. सिव्हिल इंजिनीअरिंगचा अभ्यास करणार्या  बिलासपूरच्या विद्यार्थ्यांची टीम व्हायाडक्ट आणि बहुस्तरीय वाहतूक व्यवस्थेने प्रभावित झाली, त्यांनी सांगितले की, आजचा नागपूर मेट्रोचा दौरा त्यांच्या शैक्षणिक जीवनातील सर्वात महत्त्वाचा दिवस होता.

- मेट्रो सफर ठरली विस्मरणीय

मेट्रो भवनला भेट दिल्यानंतर ह्या विद्यार्थ्यांनी रहाटे कॉलोनीपासून ते लोकमान्य नगर आणि पुढे दोसर वैश्य स्थानकापर्यंत मेट्रोने प्रवास केला. उंच पुलावरून धावणाऱ्या मेट्रोत बसून कधी न पाहिलेल्या शहराचे सौन्दर्य न्याहाळणं त्यांच्यासाठी अत्यंत आनंदाचे आणि कधीही न विसरता येणार अनुभव ठरला, असे एचओडी भूमिका मॅडम ह्यांनी सांगितले.